महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर५३९, राजेंद्रनगर,कोल्हापूर - ४१६ ००४.

दुरध्वनी क्र - ०२३१ - २६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./2951
दिनांक - २३.०१.२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय : - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) फेब्रुवारी-मार्च २०२४ लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रकाबाबत...**

**संदर्भ : - राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा - ६ /४८५३ दिनांक ०१/११/२०२३ चे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २०२४ ते गुरूवार दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ |
| २ | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची व पूर्व व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २०२४ ते गुरूवार दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ |
| ३ | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा [ फक्त अंध,मुकबधिर,बहुविकलांग ] | शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २०२४ ते गुरूवार दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ |
| ४ | लेखी परीक्षा | शुक्रवार दिनांक ०१ मार्च २०२४ ते मंगळवार दिनांक २६ मार्च २०२४ |
| ५ | आउट ऑफ टर्न परीक्षा | बुधवार दिनांक २७ मार्च २०२४ ते शनिवार दिनांक ३० मार्च २०२४ |
| ६ | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | बुधवार दिनांक २७ मार्च २०२४ ते शनिवार दिनांक ०६ एप्रिल २०२४ |

**परीक्षेसंदर्भात महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे : -**

१. प्रात्यक्षिक परीक्षा निर्धारित कालावधीत पार पाडण्याच्या दृष्टीने शाळेतील परीक्षार्थींची संख्या व प्रयोगशाळा क्षमतेनुसार परीक्षार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेवून त्याप्रमाणे परीक्षांचे नियोजन/वेळापत्रक तयार करण्यात यावे.प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत शाळाना भेटी देण्याकरिता भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्या अनुषंगाने दिनांक निहाय तयार केलेल्या वेळापत्रकाची एक प्रत विभागीय मंडळ कार्यालयाकडे सादर करावयाची आहे.

२. विज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या माहितीनुसार आपल्या शाळेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. काही अपरिहार्य कारणास्तव एखादा परीक्षक नियोजित वेळेत उपस्थित रहाणार नसल्यास नजीकच्या शाळेतील विषय शिक्षकाची परीक्षक म्हणून नेमणूक करण्यास हरकत नाही तथापि यासाठी मंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

३. विज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या माहितीनुसार आपल्या शाळेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. काही अपरिहार्य कारणास्तव एखादा परीक्षक नियोजित वेळेत उपस्थित रहाणार नसल्यास नजीकच्या शाळेतील विषय शिक्षकाची परीक्षक म्हणून नेमणूक करण्यास हरकत नाही तथापि यासाठी मंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

४. फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेपासून प्रात्यक्षिक, तोंडी, ग्रेड, अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे असून याबाबत प्रत्यक्ष करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सर्वसाधारण सूचना स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत तसेच मंडळाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

५. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यशिक्षण विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार शालेय स्तरावर आयोजित करण्यात याव्यात. एकाच दिवशी व एकाच वेळी दोन कार्यशिक्षण विषयाची परीक्षा घ्यावी लागणार नाही अशा प्रकारे परीक्षांचे नियोजन करावे.

६. वेळापत्रकाप्रमाणे आयोजित केल्या जाणा-या परीक्षा संदर्भातील माहिती म्हणजेच पेपरचा दिनांक , वार, वेळ, विषय व विषय कोड इ. बाबतच्या सर्व सूचना परीक्षेपूर्वी सर्व संबंधित परीक्षार्थ्यांना देण्याबरोबरच शाळेच्या सूचनाफलकावर स्पष्टपणे निदर्शनास येतील अशी प्रसिध्दी दयावी.

७. विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेशपत्रावर लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा क्रमांक आणि केंद्र शाळेचे नांव ठिकाण नमूद केलेले असते आणि त्याप्रमाणे परीक्षेपूर्वी संबंधित केंद्राशी संपर्क साधणेबाबत सर्व परीक्षार्थीना सूचना देण्यात याव्यात.

८. वेळापत्रकप्रमाणे परीक्षार्थीने प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी ३० मिनीटे अगोदर म्हणजेच सकाळच्या सत्रात सकाळी १०.३० वाजता व दुपारच्या सत्रात दुपारी २.३० वाजता परीक्षा दालनात हजर रहाणे आवश्यक आहे. या वेळेनंतर परीक्षा दालनात प्रवेश दिला जाणार नाही आणि त्याअनुषंगाने परीक्षाकेंद्रावर वेळेत हजर रहाण्याबाबत सर्वांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

**शासन निर्णय क्रं.संकीर्ण /२०१७/[११८/१७] / एसडी ६ / दि.१६ ऑक्टोंबर २०१८ प्रमाणे सर्व पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमानुसार लेखी परीक्षेसाठी प्रत्येक पेपरला प्रतीतास २० मिनीटे जादा वेळेची सवलत देय असेल तथापि त्यासाठी दिव्यांगाच्या विहीत प्रमाणपत्रासह प्रस्ताव विभागीय मंडळ कार्यालयाकडे सादर करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.**

९. अतिवंलब शुल्काने आवेदन भरलेल्या व गुणाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये ज्या विद्यार्थ्याचे अतिरिक्त बैठक क्रमांक उपलब्ध झालेले नाहीत अथवा विषय बदल केला आहे अशा सर्व विद्यार्थ्याचे गुण खाली नमुद केलेल्या विहीत नमुन्यात स्वंतत्र सिलबंद पाकिटातून देण्यात यावे.

<u>अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल झालेल्या बैठक क्रमांकासाठी</u>

** शाळेच्या लेटर हेडवर स्वतंत्ररित्या गुणतक्ते तयार करावयाचा नमुना

| माध्यमिक शाळा सांकेतिक क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय कोड | बैठक क्रमांक | मिळालेले गुण | |
| | | | | अंकात | अक्षरात |
| १ | | | | | |
| २ | | | | | |

१०. परीक्षार्थीनी आपल्या मुख्य आणि पुरवणी उत्तरपत्रिकेवरील तसेच आलेख , नकाशा पुरवणी वरील विहीत जागेवरच आपला बैठक क्रमांक अक्षरी व अंकी बिनचूक लिहावा.विहीत जागेशिवाय अन्य कोठेही आपला बैठक क्रमांक लिहिण्यास सक्त मनाई आहे आणि याचे उल्लंघन केल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर मंडळ शिक्षासूची नुसार कारवाई करण्यात येईल या संदर्भात सर्व विद्यार्थ्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

**११. <u>महत्वाचे</u> : मंडळाने निर्धारित केलेल्या परीक्षा कालावधीत परीक्षार्थी वैद्यकीय कारणास्तव अथवा काही अन्य अपरिहार्य कारणास्तव प्रात्यक्षिक,तोंडी,अंतर्गत मुल्यमापन इ. परीक्षा देवू शकला नाही तर अशा परीक्षार्थीसाठी OUT OF TURN मध्ये परीक्षा देता येणार असून OUT OF TURN द्वारे परीक्षा घ्यावयाचा कालावधी दि. २७.०३.२०२४ ते दि. 30.०३.२०२४ असा निर्धारित केलेला आहे. . या कालावधीतच परीक्षा घेण्यात यावी. यासाठी या तारखेपूर्वी प्रती विषय रुपये १००/- चलनाद्वारे बँकेत भरणे आवश्यक राहिल. या परीक्षांचे गुण ही ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत.**

१२. नियमित प्रात्यक्षिक,तोंडी परीक्षा दिलेले विद्यार्थी यांचे तसेच आऊट ऑफ टर्नने प्रविष्ठ झालेले विद्यार्थी यांचे गुणतक्ते व सर्व साहित्य वितरण केंद्रावर जमा करणेबाबतची तारीख मंडळाच्या संकेतस्थळावरुन यथावकाश कळविण्यात येईल.

१३. ऑनलाईन पध्दतीने भरलेले विषयनिहाय सर्व गुणतक्ते मंडळाने पुरविलेल्या एकाच सिलबंद पाकिटामध्ये विषयनिहाय बंच करून देण्यात यावे. ग्रेड लिस्ट पाकिट स्वंतत्ररित्या जमा करावे.

वरील सर्व सूचनांच्या अनुषंगाने मुख्याध्यापकानी व्यक्तीश: लक्ष घालून परीक्षा सुरळीत पार पाडणेकामी मंडळास सहकार्य करावे.

( सुभाष आर. चौगुले )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर